RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क अॅड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. 6 मार्च 2026**



1947- रेवाराम कवाडे यांच्या अध्यक्षतेखाली युगांतर हायस्कूल ( नागपूर) च्या पटांगणात दलित कवींचे पहिलें कवी सम्मेलन झाले.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

शुक्रवार, ०६ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ६७ | दैनिक | किंमत : ₹५/-
Friday, 06 March 2026 | Year : 6 | Issue : 67 | Daily | Rate: Rs. 5/-

# भारताचा तेल पुरवठा धोक्यात



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावाचे पडसाद आता हिंद महासागरातही उमटताना दिसत आहेत. श्रीलंकेच्या किनाऱ्यापासून सुमारे 40 नॉटिकल मैल अंतरावर अमेरिकन पाणबुडीने इराणी युद्धनौका बुडवल्याची घटना समोर आल्यानंतर भारताच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर विरोधकांनी केंद्र सरकारवर तीव्र टीका करत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनीदेखील या प्रकरणाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, ज्या इराणी युद्धनौकेवर हल्ला झाला, ती काही दिवसांपूर्वी विशाखापट्टणममध्ये आयोजित भारतीय नौदलाच्या मिलान नौदल सरावात सहभागी झाली होती. 19 ते 25 फेब्रुवारी 2026 दरम्यान झालेल्या या बहुराष्ट्रीय सरावात ती जहाज भारताची 'अतिथी' होती. भारताच्या समुद्री क्षेत्रातून बाहेर पडताच त्या जहाजावर हल्ला होणे अत्यंत धक्कादायक आहे, असे रमेश यांनी म्हटले.

भारतासाठी चिंता का?

भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील मानली जात आहे. भारत आपल्या सुमारे 80 टक्के ऊर्जा गरजांसाठी आयातीवर अवलंबून आहे. हिंद महासागरातील वाढती लष्करी हालचाल जागतिक व्यापार मार्ग, तेल आणि ऊर्जा पुरवठा साखळी, समुद्री वाहतूक आणि विमा दरांवर परिणाम करू शकते. विरोधकांचा आरोप आहे की सरकारची भूमिका स्पष्ट न झाल्यास भारताच्या आर्थिक आणि रणनीतिक हितांवर परिणाम होऊ शकतो.

## भारतासाठी चिंता का?

भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील मानली जात आहे. भारत आपल्या सुमारे ८० टक्के ऊर्जा गरजांसाठी आयातीवर अवलंबून आहे. हिंद महासागरातील वाढती लष्करी हालचाल जागतिक व्यापार मार्ग, तेल आणि ऊर्जा पुरवठा साखळी, समुद्री वाहतूक आणि विमा दरांवर परिणाम करू शकते. विरोधकांचा आरोप आहे की सरकारची भूमिका स्पष्ट न झाल्यास भारताच्या आर्थिक आणि रणनीतिक हितांवर परिणाम होऊ शकतो

## राहुल गांधींचा सरकारवर हल्ला

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देतांना सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, 'लवकरच एक मोठे वादळ येणार आहे. जग सध्या अत्यंत अस्थिर काळातून जात आहे आणि भारतासाठी परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. भारताचा तेल पुरवठा धोक्यात आला आहे. भारतात येणाऱ्या तेलापैकी 40 टक्क्यांहून अधिक होमुर्झमार्गे येते.' त्यामुळे या भागात वाढणारा संघर्ष भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकतो. एलपीजी आणि एलएनजीच्या पुरवठ्याबाबतही परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. लढाई आता आपल्या अंगणापर्यंत पोहोचली आहे. हिंद महासागरात इराणी जहाज बुडाले, तरीही प्रधानमंत्री शांत आहेत. अशा परिस्थितीत आपल्याला कारभारावर स्थिर हात हवा आहे. मात्र, भारताकडे एक तडजोड करणारा पंतप्रधान आहे, ज्यांनी आपली धोरणात्मक स्वायत्तता सोडून दिली,' अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.



# समाजचिंतक जेष्ठ पत्रकार प्रा. रणजीत मेश्राम यांच्यावर आज अंत्यसंस्कार



**नागपूर :** समाजचिंतक, आंबेडकरी चळवळीचे विचारवंत, अभ्यासू भाष्यकार, वैचारिक मार्गदर्शक आणि ज्येष्ठ पत्रकार प्रा. रणजीत मेश्राम यांचे बुधवारी सकाळी निधन झाले. ते 80 वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता, सामाजिक व राजकीय क्षेत्रासह आंबेडकरी चळवळींत शोककळा पसरली आहे. वैचारिक पत्रकारितेचा एक सशक्त आणि निर्भीड आवाज कायमचा हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

19 सप्टेंबर 2025 रोजी मस्तिष्काघातामुळे बेशुद्धावस्थेत मृत्युशी लढा देत होते. बुधवारी सकाळी 8.15 वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सध्या त्यांचे पार्थिव शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथील शवगृहात ठेवण्यात आले होते. शुक्रवारी सकाळी 8 वाजता त्यांचे पार्थिव इंदोरा बुद्ध विहार (जुने निवासस्थानाजवळ) येथे अंत्यदर्शनासाठी आणण्यात येईल. सकाळी 8 ते 11 या वेळेत नागरिकांना अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर वैशाली नगर स्मशान घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

प्रा. मेश्राम हे आंबेडकरी विचारसरणीचे निष्ठावंत अभ्यासक व परखड भाष्यकार म्हणून ओळखले जात. सामाजिक विषमता, संविधानिक मूल्ये आणि बहुजन हक्क या विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन व मार्गदर्शन केले. स्पष्टवक्तेपणा, तत्त्वनिष्ठ भूमिका आणि अभ्यासपूर्ण मांडणी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती.

त्यांचे शालेय शिक्षण नागपूर येथील मॉडेल हायस्कूल, बर्डी येथे झाले. काही काळ त्यांनी पाचपावली येथील एस.सी.एस. गर्ल्स हायस्कूलमध्ये अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर पीडब्ल्यूएस महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ सेवा बजावली. विद्यार्थ्यांमध्ये ते कडक शिस्तीचे पण प्रेरणादायी शिक्षक म्हणून लोकप्रिय होते. ते भारिप बहुजन महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तसेच खनिकर्म महा मंडळाचे अध्यक्ष होते.

त्यांच्या पश्चात मुलगा प्रियदर्शन (सध्या ऑस्ट्रेलिया येथे नोकरीवर), विवाहित कन्या जुई आणि पत्नी डॉ. सविता मेश्राम (मनपाच्या माजी आरोग्य अधिकारी) असा परिवार आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### आंतरराष्ट्रीय निरीक्षक पथकात महाराष्ट्रातील पाच जणांचा समावेश



**नागपूर :** कोलंबियात होणाऱ्या निवडणुकांसाठी एक पथक कोलंबियाला जाणार असून यात पाच अधिकाऱ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या पथकातील पाचही अधिकारी महाराष्ट्रातील आहेत.

8 मार्चला कोलंबियात निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पाहणीसाठी या पथकाला पाठविण्याचा निर्णय भारत निवडणूक आयोगाने घेतला आहे. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम सेथुरामन यांच्या नेतृत्वाखालील पाच सदस्यीय पथक 6 ते 10 मार्चपर्यंत कोलंबियाच्या दौऱ्यावर राहणार आहे. यात आशीर्वाद कुमार (जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर), मनोहर रामचंद्र पारकर (संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी तथा उपसचिव), प्रियेश महाजन (उपविभागीय अधिकारी, रामटेक, नागपूर), सागर शिर्के (बूथ लेव्हल अधिकारी, नाशिक) यांचा समावेश आहे. हे पथक कोलंबियातील निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करतील. कशा पद्धतीने निवडणूक होते, मतदान प्रक्रिया, मतदार यादी, सुरक्षा व्यवस्था, मतमोजणी आदींचा अभ्यास करतील. त्यांचा अनुभवही भारत निवडणूक आयोगाकडे सादर करतील. त्याच प्रमाणे भारतातील निवडणूक प्रक्रियेची माहिती तेथील अधिकाऱ्यांना देतील.

### तेलासंदर्भात भारत सरकारचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली :** इस्त्राइल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर आशियातील अनेक तेल सधन देशांमध्ये तणावाचे वातावरण आहे. आगामी दिवसांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यात व्यक्त केली जात आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या आहेत. मात्र, भारतातील मोठ्या शहरांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किंमतीवर अद्याप तरी परिणाम झाल्याचे दिसत नाही. तसेच, दुसरीकडे, आपण गॅससाठी आता केवळ कतारवर अवलंबून नाही, तर वेगळे पर्यायही शोधले जात आहेत. ऑस्ट्रेलियासहीत काही देशांनी गॅसची ऑफरही दिली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने सरकारी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, नजीकच्या काळातही पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किंमती वाढण्याची शक्यता नाही. ही ग्राहकांसाठी दिलासा देणारी गोष्ट आहे

### एसबीएल स्फोटाचे विधिमंडळात पडसाद



**नागपूर :** राऊळगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड'मध्ये झालेल्या स्फोटाचे पडसाद बुधवारी विधिमंडळातदेखील उमटले. विधानसभा व विधानपरिषदेत सदस्यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित करत चर्चेची मागणी केली. या कंपन्यांमधील त्रुटींचा फटका कामगारांना बसतो. वारंवार अपघात होत असूनही प्रशासनाने कंपन्यांवर ठोस कारवाई केलेली नाही. किती दिवस गरिबांचे जीव जाणार, असा सवाल आमदारांनी उपस्थित केला. विधानसभेत विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव मांडून चर्चेची मागणी केली. एसबीएल कंपनीत झालेला स्फोट आणि त्यात झालेली जीवितहानी ही अत्यंत दुर्दैवी आहे. नागपूर जिल्ह्यात अशाप्रकारचे 11 स्फोटक कारखाने आहेत. गेल्या दीड वर्षात या कारखान्यांमध्ये झालेल्या विविध स्फोटांत 43 कामगारांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये 25 महिलांचा समावेश आहे. केवळ 300 रुपये मजुरीसाठी जीव धोक्यात घालून हे मजूर काम करतात. म्हणून गरिबांच्या जिवाची या सरकारला काहीच किंमत उरलेली नाही का, असा सवाल त्यांनी केला.

# राज्यातील 5 हजार पशुवैद्यक अधिकारी राजीनामा देण्याच्या तयारीत



**मुंबई :** राज्यातील पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक पवित्रा घेतला असून 'महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटने'ने राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. तर अपुरे मनुष्यबळ, अतिरिक्त कार्यभार, तांत्रिक कामांचा वाढता बोजा आणि प्रशासनाची अनास्था यामुळे त्रस्त झालेले वसई तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागातील अधिकारीही या आंदोलनात सहभागी झाली आहेत. तर या आंदोलनामुळे वसई तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाचे कामकाज विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने प्रशासनाच्या अन्यायकारक धोरणांविरोधात राज्यभर टप्प्याटप्याने आंदोलनाची घोषणा केली आहे. संघटनेच्या मते पशुवैद्यकीय अधिकारी है ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांसाठी 24 तास उपलब्ध राहणारी अत्यावश्यक आपत्कालीन सेवा देणारे अधिकारी आहेत. असे असतानाही, पशुसंवर्धन विभागातील तांत्रिक अधिकारी यांना प्रत्यक्ष क्षेत्रीय तांत्रिक कामे (पशू आरोग्य सेवा, उपचार, मार्गदर्शन, शिबिरे, लसीकरण, रोगनियंत्रण इ) करण्यासाठी आवश्यक वेळ व संधी दिली जात नाही. पशुपालकांशी संपर्क कमी होतो व योजनांची अंमलबजावणीही प्रभावित होते. तथापि, याच परिस्थितीत पुढे 'काम कमी केले', 'कार्यक्षमता कमी आहे' अशा कारणांवरून संबंधित अधिकाऱ्यांना तुच्छतापूर्ण वागणूक देण्यात येते, जी अन्यायकारक व मनोबल खच्ची करणारी आहे.

# न्यायाधीशांनी पदोन्नतीची भीती न बाळगता संविधाननिष्ठ राहावे : न्या. बी.व्ही. नागरत्ना



**नागपूर :** सत्ताधाऱ्यांची नाराजी ओढवण्याची किंवा पदोन्नतीवर परिणाम होण्याची शक्यता असली तरी योग्य निर्णय घेण्यास न्यायाधीशांनी कधीही संकोच करू नये, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. बी.व्ही. नागरत्ना यांनी केले. न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार प्रभावीपणे वापरायचा असेल तर न्यायाधीशांकडे धैर्य, ठाम श्रद्धा आणि स्वायत्तता असणे अत्यावश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. एका व्याख्यानमालेत बोलतांना त्यांनी सांगितले की, न्यायालयीन पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत अनेकदा न्यायालयांना संसदेत बहुमताने मंजूर झालेले कायदे रद्द करावे लागतात, कार्यपालिकेच्या कृतींवर मर्यादा घालाव्या लागतात आणि कधी कधी घटनादुरुस्त्यांनाही असंवैधानिक ठरवावे लागते. 'ही सोपी कामे नाहीत; त्यांचे राजकीय परिणामही होऊ शकतात' असे त्या म्हणाल्या. न्यायाधीशांना कदाचित हे जाणवत असते की एखादा अप्रिय निर्णय त्यांच्या पदोन्नतीच्या संधींवर परिणाम करू शकतो किंवा सत्ताधाऱ्यांच्या 'नापसंतीच्या यादीत' त्यांचे नाव जाऊ शकते; मात्र अशा शक्यतांमुळे संविधानाने अपेक्षित केलेला निर्णय देण्यात अडथळा येऊ नये, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

## धर्मांतरणविरोधी विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी



**मुंबई :** महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या धर्मांतरणविरोधी विधेयकाला अखेर मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली. आता लवकरच हे विधेयक विधानसभेत मांडले जाणार असून त्यानंतर शासन निर्णय (GR) जारी केला जाणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मंत्री नितेश राणे यांनी ही माहिती दिली. नवीन प्रस्तावित कायद्यानुसार जर कोणी जबरदस्ती, फसवणूक किंवा प्रलोभन देऊन धर्मांतरण घडवून आणले, तर त्याच्यावर नॉन-बेलेबल गुन्हा दाखल केला जाईल. याबाबत नितेश राणे यांनी सांगितले की, अशा प्रकरणांमध्ये आरोपींना अटक करण्याची तरतूद असून, सहज जामीन मिळणार नाही. कायद्याच्या सर्व तांत्रिक बाबी लवकरच सार्वजनिक केल्या जातील. त्यांनी दावा केला की, हा कायदा मध्य प्रदेश आणि गुजरातमधील धर्मांतरणविरोधी कायद्यांपेक्षा अधिक कठोर आणि प्रभावी असेल. दरम्यान, धर्मांतरणविरोधी विधेयकासोबतच राज्य सरकार शेतकऱ्यांसाठीही मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, 30 जूनपूर्वी कर्जमाफीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला जाईल. सरकारने कर्जमाफीबाबत निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. समितीचा अहवाल एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित असून, त्यानंतर 30 जूनपूर्वी अंतिम घोषणा होईल.

## डॉ. संग्राम पाटील यांची सुनावणी सहा वेळा पुढे ढकलली



**मुंबई :** डॉ. संग्राम पाटील यांची सुनावणी सहा वेळा पुढे ढकलली गेली आहे. यामुळे ते भारतातच अडकून पडले असून नोकरी धोक्यात असल्याने तातडीने सुनावणी घेण्यासाठी पाटील यांच्या वकिलाने कोर्टाकडे विनंती केली आहे. संग्राम पाटील काम करत असलेल्या कार्यालयातून तीन वेळा नोकरीवर येण्याची नोटीस देखील देण्यात आलेली आहे. आता त्यांची नोकरी धोक्यात आहे. 18 डिसेंबर 2025 - मुंबईतील एन.एम. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात सोशल मीडिया पोस्टवरून मानहानी व इतर कलमांखाली FIR दाखल झाली. तक्रार भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती.

10 जानेवारी 2026 - लंडनस्थित डॉक्टर आणि युट्यूबर डॉ. पाटील मुंबई विमानतळावर आल्यानंतर दाखल असलेल्या गुन्ह्याच्या चौकशीसाठी पोलीसांनी ताब्यात घेऊन ताब्यात घेतले. पंधरा तासाच्या चौकशीनंतर त्यांना नोटीस देऊन नंतर सोडण्यात आले.

संग्राम पाटील यांच्याविरोधात ठाण्यातील रहिवासी निखिल भामरे यांनी तक्रार नोंदवली होती. ते भारतीय जनता पार्टीसाठी महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया संयोजक या पदावर काम करतात.

त्यांनी पोलिसांत नोंदवलेल्या तक्रारीनुसार 14 डिसेंबर 2025 रोजी 'शहर विकास आघाडी' हे खाते चालवणाऱ्या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक मजकूर प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी आपल्या नेत्याबद्दल द्वेषाची भावना पसरवली आहे अशी तक्रार भामरे यांनी केली. तसेच एका महिलेबद्दल आक्षेपार्ह माहिती यात प्रसिद्ध केल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्या मजकुराचा स्क्रीनशॉट घेतल्याचे या तक्रारीत नमूद केले होते.

# हिंद महासागरात इराणी युद्धनौकेवर अमेरिकेचा हल्ला

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील तणावात हिंद महासागरात अमेरिकेने इराणच्या युद्धनौकेवर केलेला हल्ला भारताची सुरक्षा आणि प्रादेशिक स्थिरतेसाठी चिंताजनक आहे. हा हल्ला श्रीलंकेच्या दक्षिणी किनारपट्टीच्या आसपास आंतरराष्ट्रीय सागरी क्षेत्रात झाला. जो भाग श्रीलंकेच्या शोध आणि बचाव क्षेत्राच्या कक्षेत येतो.

या बुडत्या जहाजातून 32 इराणी कर्मचाऱ्यांना वाचवण्यात आले. या घटनेनंतर आजही अनेक जण बेपत्ता आहेत अशी पुष्टी श्रीलंकेच्या नौदलाने केली. या घटनेवर श्रीलंकेतील खासदार नमल राजपक्षे म्हणाले की, ही घटना श्रीलंकेसाठी आणि हिंद महासागरासाठी गंभीर चिंतेचा विषय आहे. भारतासाठीही सुरक्षेच्या दृष्टीने हे चिंताजनक आहे. युद्ध अनेक मैल दूरीवर होत आहे परंतु हिंद महासागरातील ही हालचाल श्रीलंकेच्या किनाऱ्यापासून फक्त चाळीस नॉटिकल मैल अंतरावर आहे असे त्यांनी सांगितले.



### अमेरिकेच्या पाणबुडीने केला हल्ला

हिंद महासागरात इराणची युद्धनौका 'IRIS Dena' अमेरिकन पाणबुडीने टॉरपीडो डागून बुडवली. यामुळे दोन्ही देशांतील तणाव अधिकच वाढला आहे. महत्वाचे म्हणजे ही युद्धनौका भारतात आयोजित एका नौदल सरावात सहभागी होऊन परतत असताना हा हल्ला झाला. या घटनेनंतर इराण प्रचंड भडकला असून आंतरराष्ट्रीय पाण्यात केलेल्या या हल्ल्यासाठी अमेरिकेला गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला आहे.

### आता समुद्रात थरार...

अमेरिकेने वॉरशिप बुडवले तर इराणने तेलाचा टँकर उडवला. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध आता समुद्राच्या पटलावरही सुरु झाले आहे. या युद्धाने आता रुद्र रूप धारण केले आहे. इराणच्या 'इस्लामिक रेवोल्यूशनरी गार्ड कार्प्स'ने (IRGC) गुरुवारी दावा केला की, त्यांच्या नौदलाने उत्तर पर्शियन खाडीत एका अमेरिकन तेल टँकरवर क्षेपणास्त्र हल्ला चढवला. IRGC च्या माहितीनुसार, या हल्ल्यानंतर संबंधित जहाजाने पेट घेतला, हे जहाज अद्यापही जळत आहे.

टिट फॉर टॅट...! -महत्वाचे म्हणजे, हिंदी महासागरात काही तासांपूर्वीच अमेरिकन पाणबुडीने इराणची युद्धनौका 'IRIS Dena' टॉरपीडोच्या सहाय्याने बुडवली. ही युद्धनौका भारतातील 'मिलन 2026' नौदल सरावातून परतत होती. हिच्यावरील जवळपास 100 हून अधिक क्रू मेंबर्सचा मृत्यू झाल्याची भीती वर्तवण्यात येत आहे. या घटनेचा बदला म्हणून Tit-for-Tat कारवाई करण्यात आल्याचे इराणने म्हटले आहे. महत्वाचे म्हणजे, जगातील 20% तेल पुरवठा 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' मधून होत असल्याने, या संघर्षाचा जागतिक इंधन पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. दरम्यान, या हल्ल्यासंदर्भात अमेरिकेने अद्याप कुठल्याही प्रकारचे भाष्य केलेले नाही. यापूर्वी अमेरिकेने इराणचे असे दावे फेटाळून लावले आहेत. इराणने यापूर्वी तीन अमेरिकन-ब्रिटिश टँकरवर हल्ला करून सामुद्रधुनी 'बंद' केल्याचा दावा केला होता. मात्र, अमेरिकेने इराणच्या नौदलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले असून त्यांची 20 हून अधिक जहाजे बुडवली आहेत. सेंटकॉमच्या मते, इराणचे नौदल आता एक 'स्मृती' जमा झाले आहे

### इराणी युद्धनौकेवरील हल्ला भारतासाठी चिंतेची बाब का?

भारतासाठी ही घटना अतिशय महत्त्वाची आहे कारण हिंद महासागरात सागरी सुरक्षा, व्यापारी मार्ग आणि ऊर्जा पुरवठ्यासाठी हा प्रमुख मार्ग आहे. भारत आपल्या तेलाचा आवश्यक साठा याच सागरी मार्गाने आयात करतो. त्यामुळे कुठल्याही सैन्य संघर्षात या सागरी मार्गावरील वाहतूक आणि ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम करू शकतो. अमेरिकेच्या या कारवाईची आधी माहिती होती का याचे उत्तर श्रीलंकेच्या सरकारने द्यावे अशी मागणी खासदार नमल राजपक्षे यांनी केली आहे. अमेरिकेने अंधारात ठेवून ही कारवाई केली का याची जनतेला माहिती असावी असे त्यांनी सांगितले. दरम्यान, जर सरकारला याची माहिती होती मग त्यांनी जनतेपासून का लपवले ? जर हल्ल्याची माहिती नसेल तर सागरी क्षेत्रात इतकी मोठी कारवाई कुठल्याही सूचनेशिवाय कशी झाली हा गंभीर प्रश्न आहे. भारत सरकार आणि दक्षिण आशियातील देशांनी हा मुद्दा गंभीरतेने घ्यायला हवा. प्रादेशिक स्तरावर यावर विचार करायला हवा असेही खासदार नमल राजपक्षे यांनी म्हटले.

जिवेत शरद:शतम् !




शुभेच्छूक

विलास गजभिये (वडील), शशी गजभिये (आई), अमर व शैलेश (काका), आशा पी.टी. (मावशी) गीतांजली क्षितीज गजभिये आणि गजभिये, मेश्राम आणि दैनिक बहुजन सौरभ परिवार

बहुजन सौरभ

## संपादकीय

# इराण-इस्त्रायल संघर्ष : भारताची कोंडी

इराण-इस्त्रायल-युनायटेड किंगडम संघर्ष : भारताने मौन तोडावे की निर्णायक भूमिका घ्यावी? पश्चिम आशियात उभा राहिलेला इराण-इस्त्रायल-युनायटेड किंगडम संघर्ष हा केवळ प्रादेशिक वाद नाही; तो जागतिक सत्तासंतुलनाला हादरा देणारा भू-राजकीय भूकंप आहे. काही विश्लेषक याला '21व्या शतकातील सहा दिवसांचे युद्ध' म्हणत असले, तरी प्रत्यक्षात हे युद्ध कालमर्यादेपलीकडे जाणारे आणि तांत्रिक व वैचारिक स्तरावर लढले जाणारे आहे. या संघर्षात Iran, Israel आणि United Kingdom यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याने त्याचे पडसाद जगभर उमटत आहेत. युद्धाचे बदलते स्वरूप : रणांगण की डिजिटल आकाश? आजचे युद्ध रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाही. हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे, ड्रोन स्वॉर्म तंत्रज्ञान, सायबर हल्ले, उपग्रह-मार्गदर्शित अचूक प्रहार आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित लष्करी प्रणाली, या सर्वांचा एकत्रित वापर होत आहे. सैन्यसंख्येपेक्षा तांत्रिक वर्चस्व निर्णायक ठरत आहे. अमेरिका व इस्त्रायल दीर्घकाळ अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानासाठी ओळखले जात असले, तरी इराणनेही आपली लष्करी तयारी आणि प्रतिकारशक्ती जगासमोर सिद्ध केली आहे. हा संघर्ष दाखवून देतो की निर्बंध, आर्थिक दबाव आणि राजनैतिक एकाकीकरण असूनही एखादा देश तांत्रिक स्वावलंबन साधू शकतो. वैचारिक आणि धार्मिक ध्रुवीकरण इराणचे सर्वोच्च नेते Ali Khamenei यांच्याभोवती निर्माण झालेला तणाव हा केवळ लष्करी प्रश्न नाही; तो वैचारिक आणि धार्मिक ध्रुवीकरणाकडे नेणारा आहे. जर संघर्ष वैचारिक रंग घेतो, तर तो दीर्घकालीन आणि अधिक विध्वंसक ठरू शकतो. युरोपातील शक्ती विशेषतः ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी सावध भूमिका घेत आहेत. ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न, होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यापारमार्ग आणि जागतिक अर्थव्यवस्था यांचा विचार करता त्यांना व्यापक युद्ध टाळायचे आहे. पण त्यांच्या सावध भूमिकेमागे स्वार्थी ऊर्जा-राजकारण दडलेले नाही, याची खात्री कोण देणार? भारताची कोंडी : रणनीतिक मौन की संकोच? भारताची भूमिका सर्वात जास्त चर्चेत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अतिशय मोजकी प्रतिक्रिया दिली आहे. प्रश्न असा आहे, हे रणनीतिक संतुलन आहे की अनावश्यक मौन? भारताचे इस्त्रायलशी मजबूत संरक्षण सहकार्य आहे. क्षेपणास्त्र प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, गुप्तचर सहकार्य या सर्व क्षेत्रांत इस्त्रायल भारताचा महत्त्वाचा भागीदार आहे. दुसरीकडे, इराण भारतासाठी ऊर्जा आणि व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश आहे. चाबहार बंदर प्रकल्प भारताला अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी जोडणारा धोरणात्मक दुवा आहे. या पार्श्वभूमीवर भारताने एकीकडे झुकणे धोकादायक आहे; परंतु कायम मौन राखणेही तितकेच धोकादायक आहे. जागतिक पटलावर उदयोन्मुख महासत्ता होण्याची आकांक्षा असलेला भारत जर निर्णायक क्षणी स्पष्ट भूमिका घेत नाही, तर त्याचे नेतृत्व प्रश्नांकित होऊ शकते. ऊर्जा सुरक्षा सर्वात मोठा धोका. जर संघर्ष दीर्घकाळ चालला, तर कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढू शकतात. भारत 80 टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. तेलदर वाढले, तर महागाई, चलनफुगवटा आणि आर्थिक अस्थिरता अपरिहार्य ठरेल. सामान्य नागरिकांच्या खिशावर त्याचा थेट परिणाम होईल. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव वाढला, तर जागतिक व्यापारमार्ग विस्कळीत होऊ शकतात. भारतीय निर्यात-आयात, शेअरबाजार आणि रुपयाच्या स्थैर्यावर त्याचे परिणाम दिसतील. हा केवळ परराष्ट्र धोरणाचा प्रश्न नाही; तो भारताच्या आर्थिक सुरक्षेचा प्रश्न आहे. प्रवासी भारतीय आणि अंतर्गत परिणाम, आखाती देशांत लाखो भारतीय कामगार आहेत. युद्धाची तीव्रता वाढली, तर त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल. 1990 च्या आखाती युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर स्थलांतर आणि बचाव मोहिमा राबवाव्या लागतील. भारताने आधीच तयारी ठेवली पाहिजे. देशांतर्गत राजकारणातही या संघर्षाचे पडसाद उमटू शकतात. भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांसारख्या संघटनांनी ठळक भूमिका जाहीर न करण्यामागे सामाजिक संतुलन राखण्याची गरज असू शकते. पण आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर अस्पष्टता देशाच्या धोरणात्मक प्रतिमेला धक्का देऊ शकते. भारताने काय करावे? भारताने तीन स्पष्ट पावले उचलली पाहिजेत. शांतता उपक्रमात सक्रिय सहभाग - संयुक्त राष्ट्रसंघ किंवा बहुपक्षीय मंचांवर मध्यस्थीची भूमिका घ्यावी. भारताला दोन्ही बाजूंशी संवाद साधण्याची क्षमता आहे. ऊर्जा व आर्थिक संरक्षण योजना - पर्यायी ऊर्जा स्त्रोत, सामरिक तेलसाठा आणि व्यापारमार्गांचे विविधीकरण यावर तातडीने भर द्यावा. प्रवासी भारतीयांसाठी आपत्कालीन आराखडा, संभाव्य संकटासाठी तातडीची बचाव व स्थलांतर योजना तयार ठेवावी. आजचे युद्ध केवळ शस्त्रांचे नाही; ते तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, धर्म, राजकारण आणि जागतिक वर्चस्वाचे युद्ध आहे. या पार्श्वभूमीवर भारताने केवळ प्रेक्षक बनून चालणार नाही. रणनीतिक मौन हे कधी कधी शहाणपणाचे लक्षण असते; पण कायमचे मौन हे नेतृत्वाच्या अभावाचे प्रतीक ठरते. भारताने शांततेचा पुरस्कार करावा, पण त्याचवेळी आपल्या राष्ट्रीय हितांचे ठाम रक्षण करावे. जागतिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. पुढील काही आठवडे निर्णायक असतील. संघर्ष व्यापक युद्धात परिवर्तित होणार की संवादाच्या टेबलावर निकाली निघणार, हे काळ ठरवेल. परंतु भारताने आपली भूमिका स्पष्ट, ठाम आणि राष्ट्रहिताशी निष्ठावान ठेवली पाहिजे. भारताने संतुलित पण प्रभावी नेतृत्व दाखविण्याची हिच वेळ आहे. ■ ■

# वांगचूक-चिंब अटक, सत्तेची दडपशाही.. !

लोकशाही ही केवळ मतदान पेटीत नसते. ती रस्त्यांवर उतरलेल्या पावलांत असते. हातातल्या फलकांत दिसते. तोंडातील निर्भय शब्दांत जिवंत असते. आंदोलन हा तिचा अलंकार आहे.अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा तिचा प्राणवायू आहे. जेव्हा त्या प्राणवायूवरच कुठाराघात होतो. तेव्हा लोकशाहीचा श्वास गुदमरतो. अशा वेळी 'अघोषित आणीबाणी' हा शब्द उच्चारला तर तो अतिशयोक्ती ठरत नाही. तो वस्तुस्थितीचा आरसा ठरतो. लडाखमध्ये पर्यावरणासाठी आवाज उठवणारे सोनम वांगचूक आणि युवकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलेले उदय भानू चिंब आणि त्यांचे साथीदारांचे आंदोलन शांततापूर्ण होते. ते लोकशाहीच्या चौकटीत होते. सनदशीर मार्गाने होते. परंतु सत्तेला अस्वस्थ करणारे होते. त्या आवाजांना दडपण्याचा प्रयत्न झाला. आंदोलन म्हणजे अराजकता नव्हे. आंदोलन म्हणजे लोकशाहीचा स्पंदन होय. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर होय. आपल्या वेदनांचा, आपल्या प्रश्नांचा, आपल्या आशांचा उच्चार होय.



जेव्हा एखादा पर्यावरणवादी हिमालयाच्या कुशीत उभा राहून म्हणतो, माझ्या मातीतला बर्फ वितळतो आहे. माझ्या लोकांचा हक्क वितळतो आहे. तेव्हा तो देशद्रोह करत नसतो. तो देश प्रेमाचीच वेगळी व्याख्या सांगत असतो. सोनम वांगचूक यांचे आंदोलन हे लडाखच्या पर्यावरणासाठी होते. ते विनाशाच्या विरोधात होते. त्यांनी लोकांना एकत्र आणले. त्यांच्याशी संवाद साधला. उपोषणे केली. पत्रें लिहिली. त्यांनी संविधानाचा आधार घेतला. त्यांना सत्ताधाऱ्यांनी देशद्रोही ठरविण्याचा खटाटोप केला. तशा कलमाही लावल्या. खोट्याचे खरे दाखविण्यासाठी त्यांच्या भाषणांच्या व्हिडिओंमध्ये हेराफेरी केली. तीन मिनिटांचा व्हिडीओ सात मिनिटांचा केला. जे शब्द त्यांनी उच्चारले नव्हते. ते त्यांच्या तोंडी घातले गेले. ते सत्यावरचे आक्रमण होते. सत्तेचे कारस्थान उघड झाले. आठवड्याभरात त्यांची सुटकेची चिन्हें आहेत. युवक काँग्रेसचे अध्यक्ष उदय चिंब आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आंदोलन युवकांच्या प्रश्नांवर केंद्रित होते. बेरोजगारी, शिक्षण, संधींची विषमता. युवकांच्या मनात उसळणारी अस्वस्थता, शेतकरी विरोधी अमेरिकन व्यापारी कराराची व्यथा त्यांनी मांडली. त्यासाठी शर्टलेस आंदेलन केले. ती अस्वस्थता देशद्रोहाची नव्हती. ती भविष्याची चिंता होती. त्यांच्या आंदोलनावरही खोटे गुन्हे नोंदविले. शांततेच्या मार्गाने चालणाऱ्यांना गुन्हेगार ठरविण्याची घाई दिसली. लोकशाहीत आंदोलनाला जागा आहे. जर आहे, तर ती फक्त सत्तेच्या सोयीची नको. जर एखादे आंदोलन सत्तेला अस्वस्थ करते. तर ते दडपण्याचा अधिकार सत्तेला कोणी दिला? संविधानाने? की बहुमताने? लोकशाहीत बहुमत हे राज्य करण्याचे साधन असते. विचारांना गप्प बसविण्याचे शस्त्र नसते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे केवळ स्तुतीपर भाषणांसाठी नसते. ते टीकेसाठी असते. टीका ही लोकशाहीची शुद्धीकरण प्रक्रिया आहे. जसे नदीला प्रवाह हवा. तसेच राष्ट्राला संवाद हवा. पोलिस यंत्रणा ही कायद्याची अंमलबजावणी करणारी असते. ती सत्तेच्या दबावात येते. तेव्हा हातातील लाठी न्यायाच्या नावाने अन्याय करू लागते. शांततापूर्ण आंदोलनावर दडपशाही, अटक, खटले, ही दृश्ये लोकशाहीवर चिरे घालतात. दहा वर्षात देशभरात शेकडोंना डांबले. त्यात आयपीएस अधिकारी, वकील, जेएनयूचे विद्यार्थी, भीमा कोरेगावचे आंदोलनकारी, सामाजिक कार्यकर्ते आहेत. यातून लोकांच्या मनात भीती निर्माण होते. भीतीतून जन्मते मौन. हे मौन सर्वाधिक घातक असते. जेव्हा सत्तेला प्रश्न विचारणे गुन्हा ठरते. आंदोलनकर्त्यांवर खोटे गुन्हे लावले जातात. तेव्हा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळतो. युवक काँग्रेसच्या आंदेलनावर प्रधानमंत्र्यांनी लगेच प्रतिक्रिया दिली. त्या भाषेचा स्तर अशोभनीय होता. देशाचा सर्वोच्च कार्यकारी प्रमुख जेव्हा एखाद्या आंदोलनावर भाष्य करतो. तेव्हा त्या शब्दांना वजन असते. त्या शब्दांनी संवादाचा पूल बांधता येतो, किंवा दरी अधिक खोल करता येते. जर त्या शब्दांत आरोप असेल, तर तो खालपर्यंत पोहोचतो. प्रशासन त्याला संकेत मानते. या साऱ्या घटनांमुळे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. न्यायदानाची प्रक्रिया किती स्वतंत्र आहे? आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेले गुन्हे न्यायालयात टिकले नाहीत. लोकशाहीत न्यायालय हे शेवटचे आशास्थान असते. त्या क्षेत्रावरही दबाव वाढलेत. जेव्हा रस्त्यावरचा आवाज दाबला जातो. तेव्हा न्यायालयाच्या पायऱ्या गाठल्या जातात. पण जर न्याय मिळण्यास विलंब झाला, तर तो विलंबही अन्याय ठरतो. आंदोलनकर्त्यांना वर्षानुवर्षे खटल्यांच्या जाळ्यात अडकविणे. याचा अर्थ त्यांच्या उमेदीची शिक्षा आहे. सोनम वांगचूक आणि उदय चिंब यांची प्रकरणे केवळ दोन व्यक्तींची नाहीत. ती बंदिस्त असलेल्या शेकडोंचे प्रतीक आहे. त्या प्रत्येक नागरिकाची. जो प्रश्न विचारतो. त्या प्रत्येक तरुणाची, जो भविष्याबद्दल चिंतित आहे. त्या प्रत्येक पर्यावरण प्रेमीची, जो विकासाच्या नावाखाली होणाऱ्या विध्वंसाला थांबवू इच्छितो. लोकशाहीचे सौंदर्य तिच्या विविधतेत आहे. कोणी सरकारचे समर्थन करेल. कोणी टीका करेल. दोघांनाही जागा असली पाहिजे. पण जर टीकेची जागा अरुंद केली. तर समर्थनही अर्थहीन ठरते. मग ते समर्थन स्वेच्छेचे नसते. ते भीतीचे असते. आज प्रश्न केवळ आंदोलनांचा नाही. तो विश्वासाचा आहे. लोकांचा सत्तेवर, सत्तेचा लोकांवर आणि दोघांचा न्याय व्यवस्थेवर. हा विश्वास तुटला, तर लोकशाहीची इमारत धोक्यात येईल? आंदोलनाला दडपून प्रश्न संपत नाहीत. ते अधिक तीव्र होतात. विरोध संपविण्या संवाद हा एकमेव मार्ग आहे. पण दडपशाहीने संवादाचे दरवाजे बंद केले. आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. तो अधिकार केवळ कागदावर राहू नये. तो रस्त्यावर, सभागृहात, सामाजिक माध्यमांत जिवंत राहावा. या प्रकरणांनी एक इशारा दिला आहे. लोकशाहीचा श्वास रोखू नका. प्रश्न विचारणाऱ्यांना शत्रू समजू नका. तेच तर राष्ट्राचे सजग नागरिक आहेत. त्यांचा आवाज ऐका. त्यांच्याशी असहमती ठेवा. पण त्यांना गुन्हेगार ठरवू नका. सोनम वांगचूक यांचा हिमालयासाठीचा आक्रोश आणि उदय चिंब यांचा युवकांसाठीचा लढा. हे दोन्ही आंदोलन राष्ट्रविरोधी नव्हते. ते राष्ट्राच्या भविष्यासाठी होते. त्यांना दडपणे म्हणजे भविष्यालाच दडपणे होय. लोकशाही ही नाजूक फुलासारखी आहे. दडपशाहीचे वादळ आले, की तिची पाकळी गळते. जर आपण तिचे रक्षण केले, तर ती पुन्हा फुलते. न्यायालयाने न्याय केला. युवकांनी गुलाल उधळत होळीचा सण साजरा केला. आज गरज आहे, प्रश्न विचारण्याच्या धैर्याची आणि प्रश्न ऐकण्याच्या धैर्याची. सत्तेला टीका सहन करण्याचे धैर्य हवे. नागरिकांना शांततेने, संविधानाच्या चौकटीत राहून आंदोलन करण्याचे धैर्य हवे आणि न्यायव्यवस्थेला निष्पक्ष राहण्याचे धैर्य हवे. या दोन्ही प्रकरणांतून आपण काय शिकणार? आपण भीतीच्या सावलीत जगणार, की स्वातंत्र्याच्या प्रकाशात? हा निर्णय प्रत्येक नागरिकाला घ्यावा लागेल. आंदोलन हा गुन्हा नाही. तो लोकशाहीचा श्वास आहे. त्या श्वासाला रोखले, तर राष्ट्र गुदमरेल. म्हणूनच आज पुन्हा एकदा सांगावेसे वाटते, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा अधिकार नाही तर जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे रक्षण करणे. हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. सोनम वांगचूक आणि उदय चिंब यांच्या प्रकरणांनी आपल्याला आरसा दाखवला. त्या आरशात आपली लोकशाही दिसते. थोडी जखमी, थोडी अस्वस्थ, पण अजूनही जिवंत आहे. तिला जिवंत ठेवायचे असेल, तर आंदोलनाला जागा द्यावी लागेल. संवादाला प्राधान्य द्यावे लागेल. न्यायाला स्वतंत्र ठेवावे लागेल. कारण शेवटी, लोकशाही म्हणजे केवळ सत्ता नव्हे; ती लोकांचा आवाज आहे. अन् तो आवाज कधीच कैदेत राहू शकत नाही. ■ ■



भूपेंद्र गणवीर
9850031019

# महाराष्ट्राचे बजेट : 26-27 चा पाया सामाजिक न्याय असावा



महाराष्ट्राचे बजेट : 26-27 चा पाया सामाजिक न्याय असावा - बजेट स्पीचमध्ये सामाजिक न्यायाचे दशक घोषित करावे. शोषित वंचितांचा संपूर्ण विकास साधला तर विकसित महाराष्ट्रचे स्वप्न या दशकात पूर्ण होऊ शकते. शोषित वंचित, दुर्बल समाज घटकांसाठी सरकारी विभाग, जसे सामाजिक न्याय, आदिवासी विकास, बहुजन कल्याण, अल्पसंख्यांक, महिला व बाल कल्याण हे विभाग सरकारच्या इतर विभागाच्या तुलनेत कमी महत्वाचे समजले जाते. खरे तर हे विभाग खूप महत्वाचे आहेत. कारण शोषित वंचितांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, संविधानाच्या अनुच्छेद 21 व 46 नुसार सरकारचे कर्तव्य आहे. या विभागांना पहिल्या क्रमांकाचे कसे करता येईल असा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. 2. आम्ही संविधान फाऊंडेशन नागपूरचे वतीने मुख्यमंत्री व सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे 12 विषय लक्षवेधीचे रूपात सादर केले आहेत. वर्ष 2020 पासून प्रत्येक अधिवेशनासाठी करीत आहेत. येत्या बजेट स्पीचमध्ये त्यावर निर्णय घोषित व्हावेत. हे विषय, यावर्षी सुद्धा सोशल मीडियामध्ये पोस्ट केले आहेत. मुख्यमंत्री/मंत्री सामाजिक न्याय, मुख्य सचिव, प्रधान सचिव यांना पाठविले आहेत. सामाजिक न्यायाचे बजेट आवश्यक आहे. मागील 11 वर्षात अनुसूचित जातींच्या विकासाचे 55 हजार कोटी आणि अनुसूचित जमातीचे 17 हजार कोटींचे वर निधी सरकारने स्फ-स्फ्ह साठी कमी दिला आणि दिला तो वापरला नाही. वर्ष 2017 पासून बजेटचा कायदा का होत नाही? एवढे कठीण आहे का? सरकारच्या इच्छाशक्ती वर प्रश्नचिन्ह निर्माण होतो? पुढचे एक दशक सामाजिक न्यायाचे घोषित करावे, सामाजिक न्यायाचा पाया असलेला अर्थसंकल्प दरवर्षी सादर करावा म्हणजे विकसित महाराष्ट्र या दशकांत होईल 2047 ची वाट पाहण्याची गरज भासणार नाही. 3. 20 वर्षापूर्वी आघाडी सरकारने सामाजिक न्यायाचे बजेट सादर केले होते. 2010 मध्ये सामाजिक न्याय विभागाचे विजन डाक्युमेंट मंत्री परिषदेने मान्य केले होते. सामाजिक न्याय, नजरेसमोर ठेवून ज्या योजना तयार करण्यात आल्या होत्या आजही त्याच सुरू आहेत. त्यात सुधारणा करण्याची गरज आहे. विजन डाक्युमेंट मधील काही योजना अजूनही सुरू झाल्या नाहीत. शोषित वंचितांचा शैक्षणिक /सामाजिक/ आर्थिक विकास, आरोग्य, उपजिविका, रोजगार, सुरक्षा, अन्याय अत्याचारापासून संरक्षण, तसेच माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणाऱ्या आणि त्यांचे वस्तीत पायाभूत सुविधा देणाऱ्या काही नवीन योजना विभागाने तयार केल्या पाहिजे. आम्ही सादर केलेल्या 12 लक्षवेधीमध्ये आम्ही सुचविले. इतरांनी सुद्धा अनेक सूचना केल्या असणारच. त्यावर चर्चा व निर्णय घेतले पाहिजे. 4. मागील एक दशकातील बजेटमध्ये सरकारने केलेल्या आश्वासन पूर्तीचे, बजेट तरतुदींचे काय झाले? विशेषकरून शोषित वंचितांच्यासाठी विशेष काय करण्यात आले. याचा लेखाजोखा सरकारने विधिमंडळात सादर करावा, चर्चा घडवून आणावी. श्वेत पत्रिका प्रसिद्ध करावी. ■ ■

माझे मत



ई. झेड. खोब्रागडे
मो. 9923756900

# भारताची लोकसंख्या व तरुणाई

जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. आज भारताची लोकसंख्या 140 कोटींच्या वर पोहोचली आहे. यात 20टक्के बालके, 20टक्के वृद्ध आणि तब्बल 60टक्के तरुण आहेत. म्हणूनच भारताला 'तरुणांचा देश' असे म्हटले जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणात तरुणाई असणारा देश प्रगतीकडे झपाट्याने वाटचाल करायला हवा होता, पण वास्तव त्याच्या उलट दिसते. जपानचा आदर्श :- जपान हा देश दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झाला होता, तरीसुद्धा थोड्या काळातच त्याने फिनिक्स पक्ष्यासारखी भरारी घेतली. यामागचे कारण म्हणजे तेथील कुणीही व्यक्ती रिकामी नसते. प्रत्येकाकडे काम असते. जपान बौद्ध राष्ट्र असल्याने गौतम बुद्धांचे विचार त्यांनी आचरणात आणले. उलट भारतात बेरोजगारांची संख्या प्रचंड आहे. बेरोजगारीचे थेट परिणाम :- व्यक्तीच्या हाताला काम नसेल तर त्याच्यासह त्याच्या कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचाही विकास थांबतो. 'रिकाम्या डोक्यात भुताचा वास असतो' - बेरोजगार युवक देशहिताऐवजी विघातक कामांकडे वळतात. पैसा कमावण्याच्या हव्यासामुळे काही तरुण चुकीच्या मार्गाला लागतात. समाजकंटक त्यांना गुन्हेगारी, दहशतवाद किंवा नक्षलवादात ओढतात.

**व्यसनाधीनता आणि कौटुंबिक वेदना :-** हाताला काम नसल्याने तरुण व्यसनाच्या विळख्यात अडकतात - दारू, तंबाखू, चरस, गांजा, गुटखा, खर्रा इत्यादी. आई-वडील आपल्या लेकरांना शिकवून मोठे करतात, पण बेरोजगारीमुळे त्यांचे भविष्य उद्ध्वस्त होते. पालकांचा जीव व्याकुळ होतो.

**सोशल मिडियाचा अतिरेक :-** रिकामटेकडे तरुण दिवस-रात्र फेसबुक, व्हॉट्सॲप, मोबाईल गेम्स आणि क्रिकेट मॅचमध्ये वेळ वाया घालवतात. भांडवलदारांनी त्यांच्या हातात स्मार्टफोन दिले, पण उपयोगी रोजगार नाही.

**विवाह, मान-सन्मान व प्रतिष्ठा :-** नोकरी नसलेल्या तरुणाला समाजात मान नसतो, विवाह बाजारात मागणी नसते. त्यामुळे पत टिकवण्यासाठी तो चुकीचे मार्ग अवलंबतो.

**राजकारणाचा गैरवापर :-** तरुणांचा वापर राजकीय नेते निवडणुकीसाठी करतात. नंतर त्यांना वाऱ्यावर सोडतात. काही नेते स्वतःच्या फायद्यासाठी काही युवकांना पोसतात. राजकारण म्हणजे पैसा व सत्तेचा खेळ झाला आहे. त्यामुळे युवक चुकीच्या टोळ्यांकडे वळतात. गुन्हेगारी व दहशतवाद :- रिकामे हात आणि रिकामी डोकी दहशतवादी संघटनांचे बळी ठरतात. इंटरनेटवर नको त्या संकेत स्थळांवर रमताना त्यांची मानसिकता बिघडते. परिणामी दरोडे, लुटमार, ऑनलाईन फसवणूक, सायबर क्राईम यांसारख्या समस्या वाढतात.



**सामाजिक अस्थिरता :-** आज गाडीचा दरवाजा ठोठावून भीक मागणारे हात उद्या गाडी अडवून लुटमार करायला लागतील, ही परिस्थिती उद्भवत आहे. शिक्षितांचे लोंढे तयार झालेत, पण त्यांना रोजगार मिळत नाही. सरकारी नोकऱ्यांची कमतरता, कंत्राटी पद्धती, तुटपुंजे पगार ही खरी समस्या आहे. अनेक विद्यार्थी नैराश्यात जाऊन आत्महत्येपर्यंत पोहोचतात.

**उपाययोजना व आवाहन :-** प्रत्येकाच्या हाताला काम मिळेल अशी ठोस योजना हवी. नवे उद्योगक्षेत्र, रोजगारनिर्मितीचे मार्ग शोधले गेले पाहिजेत. युवा शक्तीला वाममार्गावर जाऊ न देता योग्य दिशा देणे आवश्यक आहे. बेरोजगारीवर समाज व सरकारने गांभीर्याने आवाज उठवणे गरजेचे आहे.

**शेवटचा इशारा :-** आजची बेरोजगारी ही वादळपूर्वीची शांतता आहे. वेळेत आवर न घातल्यास देश संकटात सापडेल. राष्ट्रवाद, धर्मांधता किंवा इतर कारणांनी हा प्रश्न झाकण्याचा प्रयत्न केल्यास उद्याच्या भारताचे भविष्य अंधारमय ठरेल. बेरोजगारी ही केवळ आर्थिक समस्या नाही, तर ती सामाजिक, मानसिक आणि राष्ट्रीय संकट आहे. तरुणाई ही देशाची खरी संपत्ती आहे. जर ही शक्ती निष्क्रिय राहिली किंवा चुकीच्या मार्गावर गेली, तर देशाचा पाया डळमळीत होईल. म्हणूनच प्रत्येकाच्या हाताला काम आणि कामाला योग्य दाम देणारी व्यवस्था निर्माण करणे हाच खरा राष्ट्रवाद आहे. आपण सगळ्यांनी मिळून बेरोजगारीविरुद्ध ठामपणे उभे राहिले, नव्या संधी शोधल्या, उद्योजकतेला चालना दिली, तरच उद्याचा भारत खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सक्षम बनेल. हीच खरी वेळ आहे, तरुणाईला वाचवण्याची, समाजाला वाचवण्याची आणि देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेण्याची. ■ ■

बेरोजगारीची समस्या



आर. के. जुमळे
93264 50506

# खरेच मुस्लिम समाज परकीय आहे का ?

आपला देश 1947 ला स्वतंत्र झाला तोच मूळात हिंदू - मुस्लिम या विषारी तत्त्व फाळणीने. यामुळे तेंव्हापासून या दोन्ही देशातील राजकारण्यांना आपापले राजकारण धार्मिकतेच्या नावावर करण्याची कायम आयती संधीच मिळाली आहे. यामुळे आपल्या भारतातील राजकर्त्यांना नेहमीच हिंदू मुस्लिमांना धर्माच्या नावावर एकमेकांपासून विभक्त ठेवून राजकारण करणे अधिक सोपे गेले. हा आयता स्वातंत्र्यापासून मिळालेला मुद्दा आपल्या बऱ्याच राजकीय पक्षांनी आपल्या राजकारणाचा प्रमुख व कायमस्वरूपी चालणारा पायाच ठरवला. पण हा मुद्दा काही राजकीय पक्षांनी दुहेरी पद्धतीने वापरला. याचा पहिला भाग म्हणजे या मुद्द्याच्या पाठीमागे दडून आपले स्वतःचे परकीयपण मनुवादी पक्षांनी झाकण्याचा मूळातून प्रयत्न केला. तर दुसऱ्या बाजूने मुस्लिमांना परकीय ठरवून व हिंदूची वोट बँक आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करून, हिंदू समाजावरच आपले परकीय सत्तेचे राजकीय मायजळ पसरवले. याची सुरुवात परकीय ब्राम्हणावळीने मोठ्या हुशारीने व तितक्याच धूर्तपणे एकाला 'हिंदुहृदयसम्राट' म्हणायला सुरुवात करून केली व त्याच्याच तोंडून 'गर्वसे कहो हम हिंदू है ' हे वाक्य वदवून घेऊन हे विष हिंदूच्या मस्तकात आपल्या स्वार्थी राजकारणासाठी अलगदपणे घुसवण्यात आले. यामुळे जे हिंदूत्व कासवाच्या गतीने वटचाल करत होते ते वाघाच्या गतीने पळायला लागले. इतकी जोराची हवा भरून हिंदुत्ववाद्यांनी हिंदूत्वाचा फुगा भारतीय भूमीवर सोडला. यामुळे संविधानकर्त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी बाबरी मशीद पाडून सुद्धा धर्मवादी हिंदूत्वाचा डांगोरा पिटून संविधानिक धर्मनिरपेक्षतेला काळीमा फासली. पण याची लाज भारतीय नागरिक म्हणून ना धर्मद्रोही राजकर्त्यांना वाटली अथवा ना हिंदूत्वाची हवा मस्तकात शिरलेल्या हिंदू भारतीय नागरिकाला वाटली. पण खरच भारतीय मुस्लिम हे या भारतीय भूमीत परकीय आहेत का? खैबरखिंडी मार्फत पहिले अतिक्रमणवादी म्हणून भारतात आलेल्या आर्यब्राम्हणांसारखे खरच ते परकीय आहेत का? याचा विचार कोणीच केला नाही. एवढेच नाहीतर खरच भारतीय मुस्लिम हे परकीय असते तर भारत पाकिस्तानच्या फाळणीत त्यांना देश सोडून जाण्याची संधी असतानाही ते का गेले नाहीत? त्यांना ही भूमी सोडावे असे का वाटले नाही? या प्रश्नांवर हिंदूत्ववाद्यांनी भारतीयांत कधीच विचारमंथन होवू दिले नाही? याचीही उत्तरे भारतीय नागरिक म्हणून ती शोधली पाहिजे. पण ती वेळीच न शोधली गेल्यामुळे, एक भारतीय समाज गट नेहमीच राष्ट्रीय विकासापासून वंचित राहिला. स्वातंत्र्यानंतरही त्याला राष्ट्रीय चळवळीत सामावून घेता आले नाही. याला जबाबदार कोण? राजकीय नेते की भारतीय जनता? कारण भारतीय मुस्लिम समाज हा मूळ भारतीय जातसमुहांचा बनलेला आहे. हेच कधी येथील राजकर्त्यांनी भारतीयांना समजून दिले नाही. त्यांनी नेहमीच भारतीय मुस्लिमांना परकीय म्हणण्याची री ओढली व ती आजपर्यंत ओढण्याचे काम सतत चालू ठेवले. यामुळे भारताच्या संविधानिक धर्मनिरपेक्षतेला तर आजपर्यंत तडा गेलाच, पण आजपर्यंत संपूर्ण भारतीयांच्या कष्टाच्या करातून जमा झालेला पैसा हिंदू - मुस्लिम प्रश्नावरच अतोनात पद्धतीने खर्च झाला. जर हे विष भारतीयांच्या मनमस्तकात राजकर्त्यांनी पेरले नसते तर, निदान तेवढ्या रूपयात अमेरिकेचे कर्ज मिटून कितीतरी पैसा शिल्लक राहिला असता. याचा अर्थ असा नाही कि भारतीय राजकारण्यांनी काहीच केले नाही. तोंडाला पाने पुसण्या इतके काम जरूर केले. मुस्लिम समाज हा भारतीय जात समुहांचा बनलेला एक संघ असल्याने, मुस्लिमांच्या विकासाकडे लक्ष वळवण्यासाठी 1950 मध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या आदेशाने एक कॉन्स्टीट्यूशनल आर्डर काढण्यात आली. पण यात शेड्यूमल्ड कास्टस हा दर्जा फक्त हिंदू धर्मियांनाच दिला असल्याने मुस्लिम धर्मात आलेल्या एससी वर्गाला हा दर्जा न देता त्यांना ओबीसी ठरवण्यात आले. यामुळे दलित-मुस्लिम आपल्या हक्कांपासून वंचित राहिले. यानतंर 1955 माजी न्यायमूर्ती काक कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील आयोग नेमण्यात आला. या आयोगाने मागासवर्गीय जाती फक्त 2399 निश्चित केल्या व या सर्व जातींचा समावेश ओबीसीमध्ये करण्याची शिफारस केली. यामुळे मुस्लिम परत वंचित झाले. पण यानंतर 1980 साली मंडल आयोग नेमण्यात आला व याने 3743 जाती निश्चित करून, त्यात 82 जाती मुस्लिम मागासवर्गीय असल्याचे नमूद केले. यामुळे मुस्लिमांना मागासवर्गीय म्हणून सवलती मिळण्याचा मार्ग कुठेतरी मोकळा झाला. पण त्याची अंमलबजावणी कासवाच्या गतीने झाली. यानंतर मुस्लिमांचा पूर्ण अभ्यास करण्यासाठी 9 मार्च 2005 मध्ये प्रधानमंत्री कार्यालयाने न्यायमूर्ती 'राजेंद्र सच्चर' समिती नेमण्याचा आदेश काढला. या समितीत अध्यक्षांसह एकूण सात सदस्य होते. पण यानंतर हिंदूत्ववादी नेत्यांनी व त्यांच्या पक्षांनी मुस्लिमांच्या लोकसंख्येचा, त्यांच्या राष्ट्रियत्वाचा, त्यांच्या ऐतिहासिक राज्यव्यवस्थेतील अन्याय अत्याचाराचा मुद्दा उपस्थित करून 'मुस्लिम धार्जिणी कांग्रेस' अशी वेगळीच कोल्हेकूई करायला सुरवात केली व आम्ही किती इतिहासप्रेमी व धर्मप्रेमी आहोत हे दाखवायला आणि हिंदू जनता भूलवायला सुरवात केली. पण या सच्चर समितीने संपूर्ण भारतभर फिरून मुस्लिमांची जनगणना, शैक्षणिक स्थिती, नौकरीतील आकडेवारी, जीवन पद्धती व त्यांच्यातील जातीं यावर चांगले लक्ष केंद्रित करून, त्यांच्या वर्गवारीचा सखोल अहवाल शासनाला सादर केला. यात या सच्चर समितीने मुस्लिम समुहाचे अश्रफ, अजफल व अरझल असे तीन वर्ग असल्याचे प्रथमच नमूद केले व त्यातील जातींचीही वर्गवारी सांगितली. या समितीने मुस्लिमातील जो पहिला वर्ग 'अश्रफ' नावाचा आहे, यात फक्त सवर्ण, ब्राम्हण व क्षत्रिय आहेत असे नमूद केले. तसेच त्यांची आडनावे सय्यद, शेख, मोगल, पठाण अशी असल्याचेही सांगितले. यानतंर मुस्लिमातला दुसरा असणारा वर्ग 'अजफल' हा होय. यात ओबीसी, बारा बलुतेदार किंवा सुतार, लोहार, शिंपी, साळी, माळी, कोष्टी असे कारागीरीचा व्यवसाय करणारे मुस्लिम आहेत. यांची नावे फक्त वेगळी आहेत. म्हणजे उदा :- चांभार-मोची (हिंदू चांभार) दर्जी (हिंदू शिंपी) बांगडीवाला (हिंदू कासार) (बाबर हिंदू नाव्ही) धोबी ( हिंदू परिट) बागवान (हिंदू माळी) पटेल (हिंदू कुणबी मराठा पाटील) मणियार (हिंदू वैदू) इ. इ. यानंतरचा मुस्लिमातला तिसरा वर्ग म्हणजे 'अरझल' हा होय. यामध्ये आजचा एससी व एसटी या वर्गाचा प्रमुख समावेश आहे. (संदर्भ :- कॉ. गोविंद पानसरे, सच्चर समिती आणि मागासलेले मुस्लिम, पान. 43) यातून एक गोष्ट प्रामुख्याने सहज समजून येते की, भारतीय मुस्लिम हे परकीय नसून ते भारतीय मातीतलेच मूळभारतीय बंधुजन आहेत. तसेच दूसरे हेही समजून येते की, इतर मूळभारतीय जातींनी मुस्लिम धर्मांत ज्याप्रमाणे धर्मांतर केले, त्याचप्रमाणे ब्राम्हणांनी व क्षत्रियांनीही केले. इतर मूळभारतीय जातींनी मुस्लिम धर्मात धर्मांतर केल्यानंतर आपला पारंपरिक हिंदू व्यवसाय सोडला नाही, तसाच ब्राम्हणांनीही सोडला नाही. उलट ब्राम्हणांनी मुस्लिम धर्मात जाऊन तेथेही हिरवा झगा घालून काझीचेच काम केले. म्हणजे आपली हिंदू धर्मातील पुरोहितशाही मुस्लिम धर्म धारण करून सुद्धा ब्राम्हणांनी तशीच जोपासली. म्हणजेच मूळभारतीय हिंदूंनी मुस्लिम धर्म स्वीकारला ते परकीय, देशद्रोही आणि ब्राम्हणांनी मुस्लिम धर्म स्वीकारला ते देशभक्त. असे कसे होऊ शकते? बरे ब्राम्हण हे फक्त धर्म बदलून आपल्या फायद्यासाठी फक्त मुस्लिम धर्मातच गेलेत असे मूळीच नाही. तर ते बौद्ध धम्मातही गेलेले आहेत व आजही येतच आहेत. बिहारच्या जागतिक बौद्ध विहारात बसलेले व ते बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात द्यायला नकार देणारे बौद्ध भिक्खू ब्राम्हणच आहेत. म्हणजेच जिकडे चंदा तिकडे ब्राम्हणी धंदा चालतो. मग तिथे ब्राम्हणांना त्यांचा धर्म, वंश, वर्ण काहीच आठवत नाही. म्हणजेच या परकीय ब्राम्हणांना फक्त मूळभारतीय जनतेवर पुरोहित म्हणून राज्य करायचे आहे व त्यांच्या टाळूवरचे लोणीच खायचे आहे हे सिद्ध होते. थोडक्यात सांगायचे म्हणजे भारतीय मुस्लिम हा आपलाच पिढीजात नातलग असून, ब्राम्हणी जाचाला व ब्राम्हणी मनुस्मृतीच्या जाचक नियम अटींना कंटाळून तो मुस्लिम धर्मात गेलेला आहे. उलट आपण आज त्याच्याशी काही वर्षापूर्वीपासून तोडलेली बंधुत्वाची नाळ पुन्हा नव्याने जोडली पाहिजे. एकमेकांपासून अलग झालेल्या दोन ओंडक्यांची भेट या मानवीसागरात झालीच पाहिजे. तरच आपल्या मानवतावादाला, आता विश्वात्मके देवाला व हे विश्वची माझे घर असे म्हणण्याला अर्थ राहिल. परकीय ब्राम्हणी चाली ओळखून आपणच आपल्या मातीतल्या लेकरांना विशाल हृदय करून जवळ घेतले पाहिजे. त्यांना उराशी कवटाळून दोन आनंदाश्रू एकमेकांच्या खांद्यावर गाळले पाहिजे. तरच संत, महापुरुष यांच्या स्वप्नातला आपण आपला भारत घडवू शकतो. तसेच परकीय ब्राम्हणी वैऱ्याच्या शेजारी बसून आपण भारतीय कधीच एक व मोठे होणार नाही. आपण जोपर्यंत आपण आपल्या वैऱ्याचे ऐकू तोपर्यंत आपण त्याच्या फायद्यासाठी एकमेकांचे मूडदे कायमच पाडत राहू. यासाठी आपण सर्वांनी मूळभारतीय भूमीचे भूमिपुत्र म्हणून व एकमेकांचे या भारतीय मातीतले बंधू म्हणून एक झाले पाहिजे. या भारतीय मातीत कोणी परका नाही. कोणी दुजा नाही. आपण सगळेच एकाच भारतमातेचे लेकरे आहोत. उलट जो परकीय आहे, तोच आपल्या दोघांना फसवतोय व आपल्या दोघांचा मलिदा एकटाच खातोय. दोघा तिसऱ्याचा लाभ करायचे सोडून द्या व एकीचा नारळ फोडा. असे जर केले तर या राज्याचे स्वराज्य व स्वराज्याचे सुराज्य होण्यास वेळ लागणार नाही. ■ ■



दिपक गायकवाड
मो. 9765046493

# सण, संस्कृती आणि समतेचा प्रश्न



ब्राह्मणी वर्णव्यवस्था टिकवण्यासाठी काही सण पोषक ठरतात का? असा आरोप केला जातो की पारंपरिक चार सण :- होळी - शूद्रांची, राखी - ब्राह्मणांची, दसरा - क्षत्रियांची, दिवाळी - वैश्य (बनिया) समाजाची, हे वर्णव्यवस्थेच्या चौकटीत समाज विभागून ठेवणारे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका समताधिष्ठित समाजरचनेची होती. त्यांनी स्पष्ट सांगितले की जाति-वर्णव्यवस्था ही विषमता, अन्याय आणि सामाजिक गुलामीची मुळे आहेत. मग जे लोक आजही या सणांना वर्णपरंपरेच्या अभिमानाशी जोडून उत्साहाने साजरे करतात, ते अनवधानाने का होईना, त्या व्यवस्थेलाच पाठबळ देत आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. जर एखादी व्यक्ती स्वतःला आंबेडकरवादी किंवा बौद्ध म्हणवून घेत असेल, तर तिने समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करणे अपेक्षित आहे. वर्णव्यवस्था ही जन्माधारित श्रेणी मानते; समता मात्र मानवाधिकारांवर आधारित असते. मग दोन्ही विचार एकत्र कसे नांदू शकतील? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुवाद आणि जातिभेदातून मुक्त होण्यासाठी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. धम्मचक्र प्रवर्तन दिनी त्यांनी समतेचा, प्रज्ञेचा आणि करुणेचा मार्ग दाखविला. त्यांच्या मते समाजरचना ही मानवी मूल्यांवर उभी राहिली पाहिजे, जन्माधारित श्रेष्ठत्वावर नव्हे. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, जे विद्वान, विचारवंत किंवा नेते समतावादी विचार मांडतात, तेच जर जाती-वर्णव्यवस्थेला बळ देणाऱ्या प्रथा, प्रतीक आणि मानसिकतेला समर्थन देत असतील, तर ही विसंगती नाही का? समाजपरिवर्तन म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे; तर विचार, आचरण आणि परंपरांचा चिकित्सक पुनर्विचार होय. सण साजरे करणे ही सांस्कृतिक बाब असली, तरी त्यामागील सामाजिक संदेश समतेविरुद्ध असेल, तर त्याचे पुनर्मूल्यांकन आवश्यक ठरते. डॉ. बाबासाहेब समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा समाज घडवू इच्छित होते. वर्णव्यवस्थेवर आधारित समाजात खरी समता कशी येईल? हा मूलभूत प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीतही नागरिकत्व, हक्क आणि संविधानिक मूल्यांबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. संविधान हा सर्व नागरिकांचा रक्षक आहे. म्हणूनच खरा आंबेडकरवाद म्हणजे, जातिभेदाचा त्याग, मानवतेचा स्वीकार, समतेची आचरणातून अंमलबजावणी आणि संविधाननिष्ठ राहणे, सण साजरे करायचे की नाही हा वैयक्तिक निर्णय असू शकतो; पण ते साजरे करताना समतेचा विचार विसरला जाऊ नये, हीच खरी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन ठरेल. ■ ■

भिक्खु धम्मशिखर
8989850668





स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -९५

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा म्हाडा कॉलनी, आंबेडकर चौक, गोधनी

दि. 14 ऑक्टोबर 2015 रोजी ग्रामपंचायत गोधनी येथील सदस्य अरुण भाई, रियाज शेख व राहुल मनोहर यांच्या आर्थिक सहकार्याने पुतळ्याची उभारणी करण्यात आली. त्यावेळी भदंत धम्मानंद महाथेरो, शिरसगाव, जिल्हा यवतमाळ यांच्या हस्ते या स्वाभिमानाच्या शिल्पाचे अनावरण करण्यात आले.

संवाद मित्र, गौरव आळणे, नागपूर

# आंबेडकराईट मुव्हमेंटचे पुरस्कार वितरण शनिवार 7 मार्चला

**नागपूर :** आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचर ही संस्था गेली अकरा वर्षांपासून आंबेडकरनिष्ठ दलित साहित्यातील उत्कृष्ट कलाकृतींना राज्यस्तरीय पुरस्कार देते. साहित्यिक व सामाजिक चळवळीत आजीवन भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ लेखकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करते. सन 2025 चे साहित्य पुरस्कार नुकतेच संस्थेने जाहिर केले असून हे पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या हस्ते देण्यात येतील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंटपॉल स्कुल व कॉलेजचे संचालक डॉ. राजाभाऊ टाकसाळे राहतील. ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार (मुंबई) यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. वसंत मून वैचारिक - संशोधन पुरस्कार डॉ. अनिल गजभिये (इंदूर), दया पवार आत्मकथन पुरस्कार प्रा. अर्जुन व्हटकर (सोलापूर), बाबुराव बागूल कथा-कांदबरी पुरस्कार विलास अंभोरे (वाशिम), नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार लोकनाथ यशवंत (नागपूर), डॉ. भगवानदास हिंदी दलित साहित्य पुरस्कार मुसाफिर बैठा (पाटणा) यांना देऊन सन्मानित करण्यात येईल. दहा हजार रूपये रोख, शाल, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे जीवनगौरव पुरस्काराचे तर प्रत्येकी पाच हजार रूपये रोख, शाल, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे इतर वाङ्मय पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण समारंभ शनिवार दिनांक 07 मार्च रोजी सायंकाळी 5:30 वाजता 'मधुरम सभागृह', विदर्भ हिंदी मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे संपन्न होईल. कार्यक्रमास येण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दादाकांत धनविजय आणि भूपेश थूलकर, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, डॉ. सविता कांबळे, डॉ. सुदेश भोवते, महेंद्र गायकवाड, राजन वाघमारे, डॉ. सुरेश वर्षे, रमेश सोमकुवर, गौरव धूल व सुमेध कांबळे यांनी केले आहे




# ज्येष्ठ पत्रकार स्मृतीशेष रणजित मेश्राम यांना जाईबाई चौधरी ज्ञानपीठाद्वारे श्रद्धांजली



**नागपूर :** स्थानिय जाईबाई चौधरी ज्ञानपीठ व माध्यमिक, प्राथमिक व कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारांपैकी एक धडाडीचे पत्रकार, लेखक, स्मृतिशेष रणजित मेश्राम यांच्या जीवनकार्याचा, कर्तृत्वाचा व पत्रकारितेतील निर्भिड लेखनाचा संक्षिप्त आलेख सादर करून त्यांना भिमगीताद्वारे भावपूर्ण श्रद्धांजली अनुसूयाबाई चौधरी सांस्कृतिक सभागृह जे.सी.डी. सदर, नागपूर येथे देण्यात आली. अध्यक्षस्थानी संचालिका प्रभाताई चौधरी होत्या. त्यांचे चळवळीतील सहकारी मित्र आचार्य सुधाकर चौधरी यांनी त्यांच्या जीवनकार्याचा व चळवळीतील कर्तव्याचा संक्षिप्त आलेख सादर करून बुद्ध आणि त्यांचा धम्म यात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मृत्यु व मृत्युनंतर काय? याविषयी सांगितलेले तथागताचे विचार, शिक्षक वृंद, कर्मचारी व विद्यार्थीनी-विद्यार्थ्यांना समजावून सांगतिले. बौद्ध धम्मात मृत्युचा शोक नाही तर स्मृतीशेष व्यक्तिच्या गुणांचे स्मरण व अनुसरण कसे करावे यावर प्रकाश टाकला. बौद्ध धम्मातूनच उदयास आलेल्या ख्रिश्चन, इस्लाम धर्मात आजही बौध्द कालीन संस्कार कसे आहेत यावर प्रकाश टाकला. धम्म धर्म नाही. धर्म आणि धम्मात असलेला फरक डॉ. बाबासाहेबांनी स्पष्ट केला आहे. धम्म हा एक सुखी जीवनाचा मार्ग असून या मार्गाने कोणत्याही धर्म, पंथ, जाती मानणारे एकत्र जाऊ शकतात. जाईबाई चौधरी ज्ञानपीठ धम्माच्या मार्गाने शिक्षण देणारी संस्था असून डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने 1922 मध्ये जाईबाईनी गोरगरिबांच्या समाजातील मुलींसाठी या शाळेची स्थापना केली. या शाळेत स्मृतीशेष पत्रकार रणजीत मेश्राम अनेकदा आले असून, स्त्रीमुक्ती शैक्षणिक चळवळ जे.सी.डी.मध्ये वेळोवेळी मार्गदर्शन करीत असत. श्रद्धांजली सभेत उपस्थित सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी, पदाधिकारी हे सदैव त्यांच्या गुणांचे स्मरण ठेवून त्यांच्या परिवारास या श्रद्धांजली कार्यक्रमाद्वारे पुण्यानुमोदन (Rejoicing in the good deeds or merits) सादर केले. समारोप प्राचार्य अर्शिया पठाण यांनी केले.

# राज्य कोणतेही भेदभाव करीत नाही तेच राष्ट्र : प्रा. देविदास घोडेस्वार

**नागपूर :** पीपल्स पॅन्थर ने भारताचे 'लोक राष्ट्र'या मिशन अंतर्गत परिचर्चा आयोजित केली. मुख्य वक्ते संविधानाचे अभ्यासक प्रा. घोडेस्वार सर म्हणाले की, या देशात विविध धर्म व जाती आहेत त्यामुळे मी भारतीय आहे ही ओळख निर्माण करावी लागेल. अनुच्छेद 19 मध्ये संविधानाने सर्वांना माणूस संबोधले आहे. एका धर्माने दुसऱ्या धर्मावर अतिक्रमण होऊ नये. संविधानाने अंमलात आलेले राज्य धर्मनिरपेक्ष असले पाहीजे. अनुच्छेद 32 मध्ये एका पोष्ट कार्डने न्यायालय दखल घेते ही संविधानाची शक्ती आहे. लोकच राजकीय संस्थेचे नियंत्रक आहेत. विविध धर्म, संस्कृती, भाषा कायम ठेऊन राष्ट्र घडवायचे आहे. हे मोठे आव्हान आम्हाला स्वीकारावे लागेल. अध्यक्षस्थानी बहुजन संघर्षचे संपादक नागेश चौधरी होते. जात नैसर्गिक नाही. त्यामुळे कोणीही उच्च नाही, कोणीही निच नाही. कुणालाही आपल्यापेक्षा उच्च जातीचा समजणे ही गुलामीची मानसिकता होय असे म्हणाले. प्रा. डॉ. केशव मेंढे म्हणाले, शासन व प्रशासन जर संविधानानुसार वागत असेल तोच राष्ट्रवाद होय. जीवन जगायचे असेल तर जनकल्याणाचे कार्य करीत रहावे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो तरी ओबीसी, मागास विद्यार्थी दखल घेतांना दिसत नाही. भुपेश थुलकर यांनी राममनोहर लोहिया यांचा एक आठवणीतील शेर सांगितला, सडक यदी सुनी हो जाय तो संसद आवारा हो जाय. असे लढण्याकरीता आवाहन केले. प्रा. प्रवीण कांबळे यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न व संघटनांचे अधिक प्रमाणात होत असलेले विघटन यावर चिंता व्यक्त केली व समन्वयाची भूमिका स्वीकारावी असे सुचित केले. प्रमोद मुन यांनी ऑफेंस इज दी बेस्ट डिफेंस अशी प्रतिकाराची भूमिका मांडली. चंद्राभाऊ ठाकरे यांनी अनुसुचीत जातीच्या 59 जाती एकत्र येऊ नये म्हणून वर्गिकरण करण्यात आले. डॉ विजय शेळ्के, दुर्वास चौधरी, गोविंद मेश्राम परिचर्चेत सहभागी झाले. प्रास्ताविक डॉ. भीमराव मस्के यांनी केले. आभार भीमराव बोरकर यांनी पार पाडले. विनोद मेश्राम, राजू भोंगाडे, अरूण प्रधान, हेमराज टेंभुर्णे, ताराचंद्र लोखंडे, ज्ञानेश्वर ढेंगरे, रामभाऊ ढाकणे, नंदू वाळ्के इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.




# धम्मेक बुद्ध विहार येथे फाल्गुन पौर्णिमेचा उत्सव



**नागपूर :** 'कही हम भूल न जाये' अंतर्गत प्रबुद्ध समाज समिती, तारासावंगा शाखा, विठ्ठलवाडी, नागपूर तर्फे धम्मेक बुद्ध विहार, डांगे लेआउट, नागपूर येथे फाल्गुन पौर्णिमेचा उत्सव साजरा झाला. सभेचे अध्यक्ष प्रबुद्ध समाज समितीचे पी आर धोंगडे होते. त्यांनी आपल्या भाषणातून मगध राज्याचे मगध साम्राज्य कसे रूपांतर झाले यावर प्रकाश टाकला. ते पुढे म्हणाले की ब्राह्मणी धर्म आणि बौद्ध धर्म यांच्यात ऐतिहासिक मरणांतिक संघर्ष झाला. धम्म प्रचारक सुनील लोखंडे यांनी फाल्गुन पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. बुद्धांनी कपिलवस्तूला दिलेली पहिली भेट हे विशेष होते. गुलचंद बौद्ध रंगारी यांनी ओबीसी समाज जागृत होत नाही याविषयी खंत व्यक्त करून बौद्धांनी त्यांचे कोणकोणते सण साजरे करायचे असतात याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन धम्मेक बुद्ध विहारचे अध्यक्ष के एन लिंगायत यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात त्रिशरण पंचशील वंदनेने झाली व त्यानंतर सर्वप्रथम रूपचंद नंदागवळी यांनी संविधानाची प्रस्तावना वाचून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी दिलेल्या 22 प्रतिज्ञांची सर्वांना शपथ दिली. या कार्यक्रमाला शामकांत जाधव व अजय फुलझेले यांची विशेष उपस्थिती होती. या धम्मसंगोष्टीच्या कार्यक्रमाचा 40 उपासक उपासिका यांनी लाभ घेतला. कार्यक्रमाचे शेवटी खीर दान झाले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲड. असोसिएशन ऑफ इंडियाची स्थापना करण्यासाठी बैठक

**नागपूर :** डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर अध्यक्ष समता सैनिक दल व मुख्य राष्ट्रीय संरक्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲड. असोसिएशन ऑफ इंडिया यांचे अध्यक्षते खाली, वकील संघटनेची नागपूर येथे स्थापनद्व करणेसाठी सभा घेण्यात आली. त्यावेळी प्रमुख उपस्थिती - आद. कॅप्टन प्रवीण निखाडे, भारतीय बौद्ध महासभा अंतरराष्ट्रीय सचिव, ॲड. बी.सी. चंद्रकापुरे माजी न्यायाधीश, ॲड. ओमप्रकाश मौर्य, ॲड. के.ओ. मौर्य मुंबई इत्यादी मंडळी उपस्थित होती. यावेळेस 1) वकिलांवर होणारे हल्ले थांबविणे 2)वकिल संरक्षण कायदा लागु करणे 3) वकिलांची स्वतंत्र वसाहत 4) सामाजिक, सामूहिक व वैयक्तिक हल्ले 5) महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार या व इतर विषयांवर चर्चा करण्यात आली, विविध न्यायिक समस्येवर तातडीने अन्यायग्रस्तांना मार्गदर्शन व मदत मिळावी म्हणून सल्ला व सहाय्यता केंद्राची निर्मिती करण्याचे ठरले. कार्यक्रमाचे संचालन ॲड. व्हि.पी. पानतावणे व इंजिनिअर - पदमाकर गणवीर व आभार ॲड. ऐ.बी. राऊत यांनी केले, बैठकीसाठी प्रामुख्याने - ॲड. ऐ.आर. मानवटकर, ॲड. शेन्डे, ॲड. प्रदिप सोमकुंवर, ॲड. आकांक्षा वानकर, ॲड. डी.बी. भैसारे, ॲड. अनील कांबळे, ॲड. धम्मा लोखंडे, ॲड मोहन आठवले, ॲड. निलेश ठोके, ॲड. संदीप दुपारे, ॲड. सोनल दुपारचे, ॲड. विजय मेश्राम, ॲड. मेश्राम मैडम, ॲड. गणेश उके व इतर बरीच मंडळी उपस्थित होते. संघटनेचे ध्येय, उद्दिष्ट व पुढील वाटचाल व ज्वलंत समस्यांचे निराकरण या बाबत मंथन करण्यासाठी लवकरच नागपुरात राज्यस्तरीय अधिवेशन घेण्यात येणार आहे.






# विद्रोही साहित्य संमेलनात संजय गोडघाटे यांच्या 'आयुष्य : एक युद्ध' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**नागपूर :** नांदेड येथील विद्रोही मराठी साहित्य संमेलनात साहित्याचा आणि विद्रोही विचारांचा जागर पाहायला मिळत आहे. या संमेलनाचे औचित्य साधून उपराजधानीतील कवी संजय गोडघाटे यांच्या 'आयुष्य : एक युद्ध' या नव्या कवितासंग्रहाचे दिमाखदार सोहळ्यात प्रकाशन करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत आणि विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्य अध्यक्षा प्रतिमा परदेशी यांच्या हस्ते या संग्रहाचे लोकार्पण करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्याला महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेले मान्यवर कवी, लेखक, प्राध्यापक आणि रसिक साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'आयुष्य : एक युद्ध' या संग्रहातून मांडलेला जगण्याचा संघर्ष आणि सामाजिक जाणीवांचे उपस्थितांनी यावेळी कौतुक केले. याप्रसंगी बोलतांना मान्यवरांनी गोडघाटे यांच्या कवितांमधील प्रखर वास्तववादावर प्रकाश टाकला. कवी संजय गोडघाटे यांच्या या साहित्यकृतीचे सर्वत्र स्वागत होत असून, त्यांच्या या यशाबद्दल गौतम ढोके, अरविंद उचित, संजय बन्सल, मुकेश सरदार, खेमराज भोयर, अशोक थोरात, अजय खडसे, शेषराव धांडे, नागेश वाहुरवाघ, सीमा भसारकर, अमृता मनोहर आणि रत्ना मनवरे आदी कवी व साहित्यिकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. विद्रोही विचारांच्या मंचावर झालेल्या या सोहळ्याने साहित्य वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे.

# प्रबुद्धांनी होळी साजरी करु नये : डॉ. अशोकानंद देशभ्रतार

**नागपूर :** बहुजन मैत्री संघाच्या वतीने नरेंद्र नगर विकास सोसायटी येथील एनआयटी प्रांगणात फिल्गुन पौर्णिमा निमित्त डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांच्या अध्यक्षतेत कार्यक्रम झाला. प्रथम मुख्य अतिथी डॉ. प्रा. सरोज डांगे आणि अध्यक्ष यांच्या हस्ते भगवान बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्रांना पुष्पांजली वाहन्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांनी फाल्गुन पोर्णिमाचे महत्व विशद करतांना म्हणाले की 'सिद्धार्थ गौतमानी गृहत्यागानंतर सतत सहा वर्षापर्यंत समाधीचा अभ्यास केला आणि त्यांना बुद्धत्व प्राप्त झाले. तेंव्हा भगवान बुद्ध चारिका करीत, बौद्ध धम्माची देशना देत सात वर्षानंतर फाल्गुन पार्णिमेच्या दिवशी कपिलवस्तुला आपल्या पूर्व कुटुंबास भेटन्याकरीता आले तेंव्हा त्यांच्या संपुर्ण कुटुंबाचा आनंद गगनात मावत नव्हता. याच दिवशी बुद्ध-पुत्र सात वर्षीय राहुल आणि लघु भ्राता नंद यांनी बुद्धाचे अग्रशिष्य सारीपुत्र यांच्या हस्ते बौद्ध धम्माची सहर्ष दीक्षा घेतली.' पुढे डॉ. अशोकानंद म्हणाले की 'सर्वच पोर्णिमेच्या दिवशी शुभ किंवा कुशल घटनाच घडतात, असे नव्हे तर काही अकुशल घटना घडन्याचा इतिहास देखील नमुद आहे. एका फाल्गुन पोर्णिमेच्या दिवशी नागवंशी बुद्ध राजा राजपुरुष यांना समाजातील काही कंटकांनी जीवंत जाळले आणि नागयज्ञ म्हणून एका मोठ्या क्रूर यज्ञास प्रारंभ केला. विषमतावादी तत्व एवढे करुनच थांबले नाहीत तर होळीच्या रुपात भस्मासुरी आनंद घेण्याचा त्यांनी प्रघात पाडला आणि याचे विदृपीकरण आज दिसत आहे. वस्तुतः फाल्गुन पोर्णिमा म्हणजे बुद्धाने आपले पूर्व कुटुंब आणि स्नेहीजनांना भेटण्याचा 'मिलन समारोह' आहे तरी सर्व मानवतावाद्यांनी, प्रबुद्धांनी आणि बौद्धांनी होळीला प्रश्रय न देता, उपोसथ ग्रहण करुन शक्य तितक्या पारमीतांना अंमलात आणणे अगत्याचे आहे. विपश्यना किंवा स्वचिंतनाद्वारे स्वतःचे मुल्यांकन करुन समाजाला आपले श्रेष्ठ द्यावे.' या प्रसंगी प्रा. डॉ. सरोज डांगे म्हणाल्या की 'प्रथम बौद्ध संगीतीचा कालावधी सात महिन्याचा होता आणि त्याचे समापन फाल्गुन पोर्णिमेच्या दिवशी झाले. भगवान बुद्धाच्या उपदेशांचे रक्षण करने म्हणजेच बंधन करने होय. परंतु कालांतराने जेंव्हा बौद्ध धम्म नाहीसा होऊ लागला तेंव्हा विषमतावादी लोकांनी त्याचे रुपांतरण स्त्रीने पुरुषाला बांधलेल्या रक्षाबंधनात केले. होळी हा सण देखील एका आदिवासी महिलेला जीवंत जाळण्याचा इतिहास आहे. 'बुद्धाने उपदेशलेल्या कालाम सुत्ताला विशद करतांना डॉ. डांगे म्हणाल्या की 'भगवान बुद्धांनी मानवतावाद आणि विज्ञानवाद पत्करुन स्वतंत्र विचार करण्याची पद्धती सांगीतली आहे, यालाच अनुसरुन डार्विन आणि कॉपरनिकस या वैज्ञानिकांनी मानव उत्क्रांतीचा इतिहास जगासमोर मांडला आहे.' संचालन श्रीराम बंसोड यांनी केले. प्रास्ताविक बहुजन मैत्री संघाचे सचिव के.बी. भागवतकर यांनी केले तर सर्वांचे आभार सुरेखा देशपांडे यांनी मानले. निलिमा दराडे यांनी दिलेल्या खिरदानाने कार्यक्रमाचे समापन झाले. कार्यक्रमास असलेल्या बहुसंख्य उपस्थितीमध्ये प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, प्रा. डॉ. सरोज आगलावे, भगीरथ मेश्राम, लता मेश्राम, नरेश धोपटे, सुनील लाऊत्रे, सविता बहादुरे, अशोक बहादुरे, विलास भागवतकर, लतिका इलमकर, सुशीला गेडाम, भारती रामटेके, स्वरुपा भागवतकर, राऊत, दुबे प्रामुख्याने उपस्थित होते.



## महत्वाचे

### अंबुलकर कन्स्ट्रक्शन कंपनीचे उद्घाटन



**नागपूर :** मे.वि.डी. अंबुलकर कन्स्ट्रक्शन कंपनी प्रो. वीरेंद्र देवदत्त अंबुलकर यांच्या अस्मित कॉलनी नरेंद्र नगर येथील कार्यालयाचे उद्घाटन नगरसेवक प्रभाग 35 चे रमेश भंडारी तसेच वरूनकुमार नागले (ऑस्ट्रेलिया) यांच्या हस्ते नुकतेच झाले.

### प्रणोती कळमकर यांना प्रबोधिनी स्टार पुरस्कार प्रदान




**नागपूर :** साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कृतिशील असणाऱ्या साहित्यिका सौ. प्रणोती हरीश कळमकर यांना प्रबोधिनी न्यूज आणि प्रबोधिनी मंच महाराष्ट्र साहित्य समूहाच्या वतीने संचालक प्रशांत रामटेके यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गुरुमाऊली सभागृह, चंद्रपूर येथे सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. स्मिता मेहेत्रे, उद्घाटक प्रा. राजकुमार मुसणे गडचिरोली, रंजना आटे वर्धा, रंजना भैसारे, शारदा भुयार उपस्थित होते. पुरस्काराबद्दल डॉ. पद्मिनी घोसेकर, डॉ. शील बागडे, डॉ. मोनाली पोफरे, प्रा. संध्या राजूरकर यांनी अभिनंदन केले.

### 'होळी लहान पुरणपोळी दान'




**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे आयोजित विविध सामाजिक उपक्रम घेण्यात येतात. होळी सणाच्या निमित्ताने विविध होळी शहरात आयोजित करण्यात येतात आणि त्यामध्ये सहभागी होण्यासाठी एकत्र आलेल्या महिला आणि पुरुष मंडळी नैवेद्य म्हणून होळीत पुरणपोळी अर्पण करतात, आणि एकप्रकारे अन्नाला अग्नी देण्यात येतो. त्याऐवजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य या पुरणपोळ्या जमा करून ज्या लोकांना या दिवशी गरीबीमुळे किंवा आश्रमांमध्ये मिळू शकत नाही त्यांना वाटप करण्यात येते. या पुरणपोळ्या विविध ठिकाणी जमा करण्यात आल्या आणि शंकरपुर स्थित डॉ. गजघाटे संचालित 'मधुरांगण' या डिम्नेशिया पीडित रुग्ण आश्रम मधील रुग्णांना वाटप करण्यात आले. यामुळे सर्व रुग्णांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता. या अभियानामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर येथील प्रधान सचिव डॉ. सुनिल भगत, मधुरांगण संचालक डॉ. वि.जी. गजघाटे, बहुजन सौरभ निवासी संपादक संध्या राजूरकर, उमेश चिट्टे, देवयानी भगत, मंगला गाणार, साहिल, पूनम आणि इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# एका गर्भवती मातेने सोडले अंधश्रद्धेचे ग्रहण !

## अंनिसचा 'सोडा अंधश्रद्धेचे ग्रहण' हा उपक्रम यशस्वी!

नागपूर : चंद्रग्रहणा निमित्त महाराष्ट्र निर्मूलन समितीने 'सोडा अंधश्रद्धेचे ग्रहण' हा अभिनव उपक्रम राबवला. ग्रहण काळात गर्भवती महिलांना ग्रहण पाळण्याची सक्ती केली जाते. त्यामध्ये गर्भवती महिलेने भाजी चिरू नये, कात्रीने काही कापू नये, नाहीतर बाळाचे ओठ फाटतात, अशी मोठी अंधश्रद्धा आजही आपल्या समाजात आहे. ही अंधश्रद्धा दूर करण्यासाठी चांदणी प्रफुल्ल थोरात या गर्भवती मातेने आज ग्रहण काळात भाजी चिरली, कात्रीने कागद कापले, जेवण केले. 'ग्रहणात गरोदर स्त्रियांनी भाजी चिरली तर बाळाचे ओठ फाटतात' या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या भ्रामक कल्पनेला आज चांदणी प्रफुल्ल थोरात या गर्भवती मातेने छेद दिला. आजच्या चंद्रग्रहणाच्या काळात स्वतः या गरोदर मातेने भाजी चिरून, फळे खाऊन या जुनाट अंधश्रद्धेवर प्रहार केला. ग्रहणाचा वेध सुरू झाल्यावर या गरोदर मातेने विविध भाज्या चिरल्या. 'माझ्या होणाऱ्या बाळावर कोणत्याही अंधश्रद्धेचा नव्हे, तर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संस्कार व्हावा, यासाठी मी हे धाडसी पाऊल उचलले आहे, या माझ्या छोट्या कृतीने गरोदर महिलांना अंधश्रद्धेतून बाहेर पडण्यास बळ मिळेल अशी मला आशा आहे. तसेच माझे माहेरचे आणि सासरचे कुटुंबीय पुरोगामी आणि विज्ञानवादी असल्यामुळे मी हे धाडस करू शकले' असे मत चांदणी प्रफुल्ल थोरात यांनी यावेळी व्यक्त केले. चांदणी या अंनिसचे कार्यकर्ते राहुल थोरात यांच्या वहिनी आहेत.



या उपक्रमाचे महत्त्व सांगताना अंनिसचे कार्यकर्ते राहुल थोरात म्हणाले की, 'खगोलशास्त्रीय दृष्टीने ग्रहण ही केवळ सावल्यांचा खेळ असलेली एक खगोलीय घटना आहे. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने हा 'सोडा अंधश्रद्धेचे ग्रहण' हा अभिनव उपक्रम राबविला. स्त्री रोग तज्ञ आणि खगोल अभ्यासक डॉ. संजय निटवे म्हणाले की, 'बाळाचे ओठ फाटणे हे जनुकीय कारणांमुळे किंवा गर्भावस्थेतील पोषणाच्या अभावामुळे होते. त्याचा ग्रहणाशी किंवा भाजी चिरण्याशी दुरान्वयेही संबंध नाही.' महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्या डॉ. सविता अक्कोळे यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या ग्रहणासंबंधी भीतीदायक अफवांमुळे गरोदर महिला विनाकारण मानसिक तणावाखाली येतात. हा तणाव बाळासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे अशा फोल समजुतींना फाटा देऊन महिलांनी मुक्तपणे वावरावे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या या अभिनव उपक्रमात सहभाग घेतलेल्या आणि ग्रहण काळात भाजी चिरून अंधश्रद्धा नाकारणाऱ्या चांदणी प्रफुल थोरात या गर्भवती मातेचे अंनिसचे कार्यकर्ते डॉ. हमीद दाभोलकर, मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, मुक्ता दाभोलकर, अण्णा कडलास्कर, रामभाऊ डोंगरे यांनी अभिनंदन केले आहे.

# बुद्ध विहार सांस्कृतिक क्रांतीचे केंद्र करू या : अशोक सरस्वती




**उल्हासनगर :** सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनासाठी सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणे आवश्यक असते. ती सांस्कृतिक क्रांती बुद्ध विहारातून घडवून आणण्यासाठी आपण सर्व बुद्धविहार संचालक आणि उपासक उपासिका या सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करूया असे आवाहन बुध्द विहार समन्वय समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती बौध्द यांनी चौथ्या राष्ट्रीय अधिवेशन समारोप समारंभाचे अध्यक्षीय भाषण करताना केले. ते शहीद अरूण वैद्य, टाऊन हॉल उल्हासनगर जि. ठाणे येथे बुध्द विहारांच्या चौथ्या राष्ट्रीय अधिवेशन समारोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. हे अधिवेशन इव्हेंट नसून कार्यकर्त्यांना कृती कार्यक्रम देण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे. दरवर्षी एक लाख लोक पालि भाषा परीक्षा देतील हे उद्दिष्ट ठेवून काम करण्यात येईल. 15 मार्च दरवर्षी बुद्ध विहार समन्वय दिवस साजरा करण्यात येणार असून त्या दिवशी समितीला एक लाख लोकांनी केवळ 100 रुपये प्रतिवर्ष दान देण्याची परंपरा निर्माण करावी. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर प्रत्येक जिल्ह्यात आयोजित करण्यात येणार असून 2027 चे पाचवे राष्ट्रीय अधिवेशन मध्य प्रदेशात घेण्याची घोषणा त्यांनी केली. एक तासाच्या भाषणात त्यांनी बुद्ध विहार समन्वय भारतभर कसे नेता येईल याचा आराखडा सादर केला. याप्रसंगी भिक्खू संघ प्रतिनिधी, भिक्खू शिलरक्षित महास्थवीर, भिक्खू कुसल धम्म सुंथरो, तमिळनाडू राज्य प्रतिनिधी जी.मोहनन आणि सुब्रह्मणि, मध्य प्रदेशातील बी.के.खातरकर, दिल्ली येथील बनवारीलाल आणि प्रकाश जांभूळकर, राजस्थान येथील भेरुलाल नामा बौद्ध आणि सुनील लोहिया, आचार्य राजेंद्र भालशंकर, जी.बी. पवार, राहुल खांडेकर, आनंदा कांबळे, प्रा. डॉ. आनंद भालेराव, डॉ. यशवंत ढगे, त्र्यंबक ढोके, विजयकुमार जांभूळकर, धर्मदास डवले, सिद्धार्थ साळवे, सदानंद जाधव, दिगंबर हजारे हे प्रतिनिधी तसेच मेहेरा गायकवाड, स्मिता खैरनार आणि महेंद्र बुध्दरत्न बारसागडे, राजेंद्र कांबळे, प्रा. घनशाम धाबर्डे, उपाध्यक्ष अशोक बोंदाडे, सचिव ए.के. पाटील, ॲड. उत्तमकुमार शेंडे मंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक महेंद्र बुद्धरत्न बारसागडे यांनी केले. संचालन धर्मदास डवले यांनी तर आभार प्रदर्शन दिगंबर हजारे यांनी केले. भिक्खू शीलरक्षित महास्थवीर यांनी धम्म ध्वजारोहण केले. त्यावेळी समितीच्या धम्म सभेचे अध्यक्ष भिक्खू कुशल धम्मो सुंथरो आणि भिक्खू संघ प्रमुख पाहुणे उपस्थित होते. शामदादा गायकवाड यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन झाले. अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महस्थाविर यांनी अध्यक्षीय भाषण करून उपदेश केला. या प्रसंगी मुख्य पाहुणे म्हणून तामिळनाडू येथील जी. मोहनन यांनी मार्गदर्शन केले. स्वागताध्यक्ष डॉ. चंद्रकांत साळवे यांनी स्वागतपर भाषण केले. महेंद्र बुध्दरत्न बारसागडे यांनी प्रास्ताविक केले. अशोक सरस्वती बौध्द यांनी अधिवेशनाची भूमिका मांडली. प्रा.डॉ. आनंद भालेराव यांनी संचालन केले. दिगंबर हजारे यांनी आभार प्रदर्शन केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648